संक्रमण शिबीर गाळे वितरणबाबत अवलंबवयाची कार्यपध्दती.

## मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ

गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई -400051.

क्र.उपमुअ/संगा/दुवपु/ET- ३१५० /2022 दि. 23/09/2022

**परिपत्रक :**

**पहा :-** मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/ प्राधिकरण यांचे परिपत्रक क्र. उपमुअ/संगा/3203/2021 दि.13.10.2021.

मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाद्वारे म्हाड कलम 1976 अन्वये मधील प्रकरण 8 व 8(अ) अनुसार उपकरप्राप्त इमारतीच्या भाडेकरू / रहिवाश्यांना त्यांची उपकरप्राप्त इमारत धोकादायक अथवा दुरूस्तीच्या कामी हाती घेतली असल्यास अशा भाडेकरू / रहिवाश्यांना उपकरप्राप्त इमारतीमधून मंडळाकडे उपलब्ध असलेल्या संक्रमण शिबीरामध्ये (Transit Camp) कार्यकारी अभियंता यांच्या प्राप्त प्रस्तावानुसार तात्पुरते स्थलांतर देण्यात येते.

त्याअनुषंगाने मा.उपाध्यक्ष/ प्राधिकरण यांनी संक्रमण शिबीर गाळे वितरणबाबत अवलंबवयाच्या कार्यपध्दतीच्या अनुषंगाने दि.13.10.2021 रोजी परिपत्रक निर्गमित केले आहे. तथापि असे निदर्शनास आले आहे की, उपरोक्त मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/ प्राधिकरण यांनी दि.13.10.2021 रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकाच्या अनुषंगाने विहित कार्यपध्दतीचा अवलंब न करता संबंधित कार्यकारी अभियंता यांचेकडून सरसकट संक्रमण शिबीर गाळे वितरणाबाबतचे प्रस्ताव प्राप्त होत आहेत. तसेच संबंधित कार्यकारी अभियंता यांच्याकडून सन 1971 ते दि.01.01.2010 या दरम्यानच्या कालावधीमधील तसेच सन 1971 व त्यापूर्वीच्या सुध्दा निष्कासन सुचनेच्या आधारे संक्रमण शिबीर वितरण करण्यात यावे, असा प्रस्ताव संक्रमण शिबीर विभागाकडे संबंधित कार्यकारी अभियंता यांचेकडून प्राप्त होतात जेव्हा कि निर्गमित केलेली निष्कासन सुचनेचा कार्यकाळ हा 50 वर्षापेक्षा जास्त कालावधी लोटलेला असताना अशा निष्कासन सुचनेवर संक्रमण शिबीर गाळे वितरण करण्याबाबतचा प्रस्ताव सखोल तपासणी न करता सरसकट प्राप्त होतात हि बाब प्रशासकीय दृष्ट्या इष्ट नाही.

मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ दरवर्षी मान्सुनपूर्वी उपरकप्राप्त इमारतीचा सर्वे करून धोकादायक / अतिधोकादायक इमारती जाहिर करून त्या जाहिर करीत असताना त्यामधील रहिवाशी यांना अतितात्काळ संक्रमण शिबीर देणे आवश्यक असते. सन 2022-23 या कालावधीसाठी ज्या उपकर प्राप्त इमारती धोकादायक / अतिधोकादायक जाहिर केले असून त्यामधील जवळपास 550 भाडेकरू/ रहिवाश्यांना संक्रमण शिबीरात गाळे वितरणाची कार्यवाही प्राधान्याने सुरू आहे. तसेच ज्या उपकर प्राप्त इमारती सरंचनात्मक दुरूस्तीसाठी घेण्यात आले आहेत त्या इमारतीतील भाडेकरू/ रहिवाश्यांना प्राधान्य क्रमाने संक्रमण गाळ्याचे वितरण करणे आवश्यक आहे. तथापि मंडळाकडे आवश्यकते प्रमाणे संक्रमण गाळे उपलब्ध नसल्याने धोकादायक/ अतिधोकादायक इमारतीतील रहिवाश्यांना तसेच दुरूस्तीसाठी हाती घेतलेल्या इमारतीमधील रहिवाश्यांना संक्रमण गाळे वितरण करणे जीकरीचे होत आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता यापूर्वी दि.13.10.2021 रोजी निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकामध्ये खालीलप्रमाणे फेरबदल करून सुधारीत परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

1. दि.01.01.2010 व त्यापूर्वीच्या वर्षापर्यंत निर्गमित करण्यात आलेल्या निष्कासन सुचनेच्या आधारे संबंधित कार्यकारी अभियंता यांनी संक्रमण शिबीर गाळ्याचे वितरण करणेबाबतचा प्रस्ताव सादर करू नये.
2. तथापि अपवादात्मक स्थितीमध्ये दि.01.01.2010 पूर्वीच्या निष्कासन सुचनेच्या आधारे संक्रमण शिबीर गाळ्याचे वितरण करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करावयाचा असल्यास अशा प्रस्तावास संबंधित उपमुख्य अभियंता/दुवपु मंडळ यांचे मान्यतेने सादर करावा. तसेच सदर प्रस्ताव यापूर्वी दि.13.10.2021 रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकाच्या अनुषंगाने विहित कार्यपध्दत अवलंबून सादर करावा.



Scanned by Scanner Go

3. दि.01.01.2010 नंतरच्या निष्कासन सुचनेच्या आधारे संक्रमण शिबीर गाळ्याचे वितरण करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करताना दि.13.10.2021 रोजी मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण यांनी निर्गमित केलेल्या परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करून प्रस्ताव सादर करावा.
4. संबंधित कार्यकारी अभियंता यांचेकडून प्राप्त झालेला प्रस्ताव सदोष वाटल्यास सदर प्रस्तावावर उपमुख्य अधिकारी/संगा/दुवपु मंडळ यांनी स्तरावर सक्षम पक्षकारास सुनावणीची संधी देऊन प्रस्तावाची खातरजमा करावी.
5. मंडळाने धोकादायक व अतिधोकादायक इमारती घोषित झाल्यानंतर त्यासंबंधीचे भाडेकरूंना प्राधान्याने संक्रमण शिबीर गाळे देण्यात यावे त्यास सुनावणीची आवश्यकता राहणार नाही.
6. उपरोक्त सुनावणी संक्रमण शिबीर गाळ्याच्या वितरणाबाबतचा प्रस्ताव अमान्य केल्यास याबाबत मा.मुख्य अधिकारी/ दुवपु मंडळ यांचेकडे 15 दिवसांत अपिल दाखल करण्याबाबत संबंधित भाडेकरू/ रहिवाशी यांना आवश्यकता असल्यास निदर्शनास आणून देण्यात यावे.
7. सुनावणीत घेतलेल्या निर्णयानुसार संक्रमण शिबीर गाळ्याचे वितरण करताना संक्रमण गाळ्याची उपलब्धता तसेच भाडेकरू/ रहिवाशी यांची मागणी विचारात घेता संक्रमण गाळे वितरणाबाबत कार्यवाही करण्यात यावी.
8. संक्रमण शिबीर गाळे विभागाने संक्रमण गाळ्याचे वितरण करताना प्रथमतः मंडळाने जाहिर केलेल्या धोकादायक/ अतिधोकादायक इमारतीमधील भाडेकरू/ रहिवाशी त्यानंतर संरचनात्मक दुरूस्तीसाठी हाती घेतलेल्या इमारतीमधील भाडेकरू/ रहिवाशी त्यानंतर ज्या संक्रमण शिबीराचा पुनर्विकास सुरू आहे त्या संक्रमण शिबीरातील रहिवाशी अशा क्रमाने संक्रमण गाळ्याचे वितरण करण्याबाबत प्राधान्यक्रम ठेवावा.
9. तथापि आपात्कालीन परिस्थितीमध्ये जीवित व आर्थिक हानी टाळण्याच्या दृष्टीकोनातून अशा दुर्घटनाग्रस्त इमारतीमधील रहिवाश्यांना तात्काळ संक्रमण गाळ्याचे वितरण करावे.
10. दि.01.01.2010 व त्यापूर्वीच्या वर्षापर्यंत निर्गमित करण्यात आलेल्या निष्कासन सुचनाधारकांना संक्रमण गाळ्याची मागणी न करता अशा निष्कासन सुचनाधारकांनी बृहतसुचीवरून कायमस्वरूपी गाळ्यासाठी अर्ज करण्याकरीता संबंधितांस कळविण्यात यावे.

वरील परिपत्रकाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी व संक्रमण शिबीर गाळे वितरणबाबतचा प्रस्ताव सादर करताना उपरोक्त परिपत्रकाप्रमाणे कार्यपध्दत अवलंबून प्रस्ताव सादर करावा अन्यथा संबंधित कार्यकारी अभियंता यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

सदरहू परिपत्रक तात्काळ अंमलात येईल.

उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
मुंबई.

प्रत :- मा.प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय,मुंबई यांना माहितीस्तव सादर.
प्रत :- अप्पर पोलिस महासंचालक, तथा मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/ प्राधिकरण यांना माहितीस्तव.
प्रत :- मुख्य अधिकारी/ दुवपु मंडळ यांना माहिती व पुढील कार्यवाहीकरीता.
प्रत :- सहमुख्य अधिकारी/दुवपु मंडळ यांना माहिती व पुढील कार्यवाही करीता.
प्रत :- उपमुख्य अभियंता / परिमंडळ-1,2,3,4 /दुवपु मंडळ यांना माहिती व उपरोक्त परिपत्रकाची काटेकारेपणे अंमलबजावणी करण्यासाठी.
प्रत :- निवासी कार्यकारी अभियंता/दुवपु मंडळ यांना माहिती करीता.
प्रत :- उपमुख्य अधिकारी/संगा/दुवपु मंडळ यांना माहिती व पुढील कार्यवाही करीता.
प्रत :- उपमुख्य अधिकारी/पुगा /दुवपु मंडळ यांना माहिती व पुढील कार्यवाही करीता.
प्रत :- कार्यकारी अभियंता/ अ, बी-1-2, सी-1,2,3/ डी-1,2,3/ ई-1,2, ग-दक्षिण-उत्तर, फ-दक्षिण-उत्तर/ दुवपु मंडळ यांना माहिती व उपरोक्त परिपत्रकाची काटेकोरपणे अंमलबजावणी करीता रवाना.
प्रत :- प्रशासकीय अधिकारी/दुवपु मंडळ यांना माहिती करीता.

C:\Users\Mhada\Desktop\Janardan\paripatrak.docx

Scanned by Scanner Go